# उत्तमविद्या

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे गृहपत्र

अंक बारावा

जून २००८



शैक्षणिक विशेषांक

# गांधी रिसर्च फाऊंडेशन



उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जैन इरिगेश सिस्टीम आणि जैन चॅरिटीज यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ परिसरात २००६ मध्ये गांधी रिसर्च फाऊंडेशनची स्थापना करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या क्रीडा संकुलानजीकच्या टेकवडीवर विद्यापीठाने यासाठी १९ एकर जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. येथे महात्मा गांधींचा पुतळा उभारण्यात आलेला आहे. या फ़ाऊंडेशनतर्फे महात्मा गांधींच्या संदर्भातील संपूर्ण वाङ्मय संकलित करण्यात येत आहे. महात्मा गांधींच्या जीवनकार्याशी निगडित ४००० पेक्षा अधिक छायाचित्रे डिजीटलाईज् करण्यात आली आहेत. गांधीजींच्या संदर्भातील ४५ चित्रपट व माहितीपट या फाऊंडेशनकडे उपलब्ध आहेत. जगभरातील ७० देशांनी काढलेली गांधीजी विषयीची पोस्टाची तिकीटे तसेच चलनी नाणे व नोटा येथे पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. गांधींच्या निकटवर्तियांची मूळ हस्ताक्षरे देखिल उपलब्ध आहेत. या फाऊंडेशनतर्फे चित्रप्रदर्शन, कार्यशाळा, चर्चासत्रे, विद्यार्थी व शिक्षकांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात. या फाऊंडेशनने ग्रामीण भागात ७१ केंद्र स्थापन केली आहेत. विविध शाळांमध्ये मोहन ते महात्मा हे प्रदर्शन दाखविण्यात आला असून त्याचा लाभ ४० हजार विद्यार्थ्यांनी घेतला आहे. मेक्सिकोमधील सेटीस विद्यापीठात देखिल चित्रप्रदर्शन दाखविण्यात आले आहे. विद्यापीठातील ग्रंथालय इमारतीच्या तळमजल्यावर गांधींविषयीचे संग्रहालय सर्वांसाठी खुले आहे. ज्या शाळा महाविद्यालयांना गांधीविचारांविषयी परिक्षा घ्यावयाची असेल किंवा विद्यार्थ्यांसाठी चित्रप्रदर्शन लावायचे असेल त्यांनी प्रा. नरेंद्र शर्मा, समन्वयक गांधी रिसर्च फाऊंडेशन यांचेशी दूरध्वनी क्रमांक ०२५७-२२५८१८१ वर अथवा E-mail - info@gandhifoundation.net यावर संपर्क साधावा.

# वसतिगृह सुविधा





**विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी दोन विद्यार्थी वसतिगृहे असून त्यातील क्षमता ३४२ विद्यार्थी इतकी आहे. विद्यार्थिनींसाठी दोन वसतिगृहे असून त्यांची क्षमता २०४ विद्यार्थिनींची आहे. या चारही वसतिगृहांमध्ये आवश्यक सर्व सुविधा, रिक्रिएशन हॉल उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त २०० विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह अशी दोन नवी वसतिगृहे उभारली जात असून, त्यांचे काम लवकरच पूर्ण होणार आहे.**